# जीवनविद्या स्मरणी

लेखक

सद्‌गुरू श्री. वामनराव पै

किंमत ५ रुपये

प्रकाशक :
**नाम संप्रदाय मंडळ,**
अे-२, सिद्धार्थ नगर, बिल्डींग नं. ५,
धीरज उपवनच्या समोर,वेस्टर्न एक्सप्रेस हायवे,
बोरीवली (पूर्व), मुंबई-४०० ०६६.
दूरध्वनी : २८८७ ९०१५
फॅक्स : ०९१-०२२-२८८७ ९०१६

## प्रकाशकाची प्रस्तावना

''जीवनविद्या स्मरणी'' ही छोटी पुस्तिका वाचकांना सादर करताना आम्हाला फार आनंद वाटत आहे. 'स्मरण तसे जीवन' हा जीवन सिद्धांत लक्षात घेता जीवनात स्मरण या शक्तीचे किती महत्व आहे, हे लक्षांत येईल. म्हणूनच नामस्मरणाला महत्व प्राप्त झाले आहे. नामस्मरण करण्यासाठी १०८ मण्यांची माळ असते, तिला स्मरणी असे म्हणतात. प्रस्तुत छोटी पुस्तिका 'जीवनविद्या स्मरणी' ही त्याच प्रकारची आहे. या पुस्तिकेत सद्गुरुंनी मंतरलेले जीवनविद्येचे निवडक सिद्धांत आहेत. या जीवनविद्या स्मरणीचे प्रत्येक दिवशी साधकांनी वाचन करावे व सद्गुरुबोध नित्य स्मरणात ठेऊन जीवन जगावे अशी अपेक्षा आहे. जो जीवनविद्या स्मरणी नित्य स्मरणात ठेऊन जीवन जगेल, त्याचे जीवन सुख, शांती, समाधान व आनंद यांनी फुलत राहील असा सद्गुरुंचा आशीर्वाद आहे.

सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

पहिली आवृत्ती : १९९२
२१ वी आवृत्ती : मे २००३
४००० प्रती : जुलै २००३
६००० प्रती : ऑगस्ट २००३
७,९०,००० प्रती : ऑगस्ट - ०३ पर्यंत

मुद्रक :
**ग्राफिटेक**
९२-अे, व्ही. एन्. पुरव मार्ग,
चुनाभट्टी, सायन, मुंबई - २२.
दूरध्वनी - २५२२ ८१४२

# जीवनविद्या स्मरणी

**१**

वास्तववादाच्या अधिष्ठानावर प्रयत्नवादाची कास धरीत विकासवादाकडे झेप घेणे म्हणजे जीवनविद्या.

**२**

स्वानंदाचा उपभोग घेण्यासाठी निसर्गदेवतेने जी व्यवस्था केली त्या व्यवस्थेला 'जीवन' असे म्हणतात.

**३**

आकाशात सुखाने विहार करण्यासाठी पक्षाला दोन पंखांची गरज असते त्याचप्रमाणे जीवनाच्या गगनात आनंदाने व डौलाने विहार करण्यासाठी माणसाला प्रपंच आणि

परमार्थ या दोन्हींची नितांत आवश्यकता असते.

४

जीवन जगणे ही कला असून ती आत्मसात केल्याशिवाय जीवन सुखी, समृद्ध व यशस्वी होणे शक्य नाही.

५

जीवन म्हणजे खेळ, जुगार किंवा संगीत नसून ते एक न संपणारे युद्ध आहे.

६

ज्ञान हाच देव जो सर्व सुखाला कारणीभूत होतो,तर अज्ञान हाच सैतान जो सर्व दुखाःला कारणीभूत ठरतो.

७

जीवन हे जेवण असून प्रमाणात असलेले काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर या प्रेरणा म्हणजे प्रत्यक्षात त्या



जेवणातील मीठ, लोणचे, चटणी, रायते, कोशिंबीर व पंचामृत होय.

८

निसर्ग नियमांसहित, स्वयंचलित, स्वयंनियंत्रित, नैसर्गिक, पद्धतशीर व्यवस्था म्हणजे परमेश्वर.

९

परमेश्वर म्हणजे मूर्ती नाही, व्यक्ती नाही किंवा नुसती शक्ती सुद्धा नाही. परमेश्वराचे आनंद हे स्वरूप असून जाणीव हे त्याचे रूप आहे व शक्ती हा त्याचा गाभा होय.

१०

''सर्व ठिकाणी देव भरलेला आहे'' ही कल्पना चुकीची असून वस्तुस्थितीला धरून नाही, सर्व

ठिकाणी भरून राहिलेला आहे, तो देव नसून चैतन्य होय आणि हे चैतन्य सर्वत्र जीव रुपात वास करते.

११

जगातील सर्व धर्मांतील सर्व लोकांसाठी सर्व शक्तिमान परमेश्वर एकच असून तो कोणावरही कृपा किंवा कोप करीत नाही, तर केवळ माणूसच स्वतःच्या कर्मांनी स्वतःवरच कृपा किंवा कोप करीत असतो.

१२

जगातील सर्व धर्माचे सर्व लोक देवाधर्माच्या नांवाखाली खूप कांही करीत असतात, पण प्रत्यक्षात मात्र ते जे कांही करतात, त्या कर्मकांडांत देवही नसतो व धर्मही नसतो.



१३

''तुम्ही सुखाने जगा व इतरांना सुखाने जगू द्या'', या धारणेला खरा धर्म असे म्हणतात.

१४

माणसाने निर्माण केलेल्या परमेश्वराच्या पाषाणाच्या मूर्तिपूजेत गुंतून न राहता, 'विश्वातील प्रत्येक माणूस हीच साक्षात् परमेश्वरानेच निर्माण केलेली परमेश्वराची जीवंत मूर्ती आहे', या सत्याची जाणीव ठेवून जीवन जगण्यात खरी मूर्तीपूजा व खरा धर्म असून त्यात मानवजातीचे कल्याण तर आहेच, शिवाय मानवजातीच्या सर्व समस्या सहज सोडविण्याचे सामर्थ्य सुद्धां त्यांतच आहे.

१५

अखिल मानव जातीसाठी धर्म एकच आहे व तो म्हणजे जीवन धर्म असून प्रचलित असलेले सर्व धर्म हे प्रत्यक्षात धर्म नसून संप्रदाय होत.

१६

'आपण सुखी व्हावे, इतरांचे काय वाटेल ते होवो' अशी वृत्ती ही प्रकृती, 'आपले काय वाटेल ते होवो पण दुसऱ्यांचे वाटोळे झालेच पाहिजे' अशी वृत्ती ही विकृती आणि 'आपण सुखी असावे व इतर सर्व सुखी व्हावेत' अशी वृत्ती ही संस्कृती होय.

१७

माणूस त्याच्या स्वतःच्याच विचार, उच्चार,आचार यांच्याद्वारे नियती



निर्माण करीत असतो आणि त्यानेच निर्माण केलेली त्याचीच नियती त्याच्या सुख-दुःखाला कारणीभूत ठरत असते.

१८

अर्थ प्राप्त करून देणारे, स्वार्थ साधणारे, अनर्थ निर्माण करणारे व परमार्थ सिद्ध करणारे असे हे मन आपल्या जीवनाचे केंद्र असून ते मनच राम आहे किंवा रावण आहे, शंकर आहे किंवा भयंकर आहे, मोक्ष देणारे किंवा कपाळमोक्ष करणारे आहे.

१९

मनाने आपल्याला जिंकणे हा प्रपंच तर मनाला आपण जिंकणे हा परमार्थ होय.

२०

समाजाची सुरेख धारणा करण्याचे अतूल सामर्थ्य फक्त एकाच गोष्टीत आहे व ते म्हणजे 'शहाणपण' (Wisdom) हे होय. म्हणून शहाणपणाचा अभाव हाच अधर्म असून शहाणपणाचा प्रभाव हाच खरा धर्म होय.

२१

शुभ चिंतन व ईश्वर स्मरण यांत रंगलेले मन प्रत्यक्षात सर्व चिंता नाश करणारा चिंतामणी, सर्व संकल्प सिद्ध करणारा कल्पतरु व सर्व कामना फलद्रूप करणारी कामधेनू होय.



२२

''जे शहाणपण माणसाला त्याच्या तारुण्यात मिळणे आवश्यक असते ते शहाणपण त्याला त्याच्या वृद्ध अवस्थेत अगदी शेवटी-शेवटी सुचते'', हीच मानवजातीची खरी शोकांतिका होय.

२३

संगत धरण्यात माणसाने सावध असले पाहिजे, कारण सत्याचा साक्षात्कार घडवून आणण्याचे किंवा पूर्ण सत्यानाश करण्याचे प्रचंड सामर्थ्य संगतीत आहे.

२४

जीवनाचे वाळवंट किंवा नंदनवन करण्याचे विलक्षण सामर्थ्य चिंतनात आहे.

२५

निसर्ग नियमांशी सुसंगत असे जीवन जे जगतात, त्यांच्यावर निसर्ग देवतेकडून कृपेची बरसात होते, त्याच्या उलट जे निसर्ग नियमांना लाथाडतात त्यांना निसर्ग नियमांकडून लाथा खाण्याचे प्रसंग येतात.

२६

''तुम्ही इतरांना जे सुख किंवा दुःख द्याल ते सुख-दुःख न चुकता तुमच्याकडे बुमरँग होऊन परत येईल,'' हा निसर्गाचा अटळ नियम आहे.

२७

''आनंद वाटता वाटता आनंद लुटण्यासाठीच माणसाचा जन्म



आहे'', हे सत्य न उमजल्यामुळे मानवजातीपुढे अनेक समस्या निर्माण होतात.

२८

देवासकट सर्व कांही प्राप्त करून देण्याचे सामर्थ्य प्रयत्नांत आहे, म्हणून प्रयत्न हे रत्न देवापेक्षाही श्रेष्ठ होय.

२९

परमेश्वर एक पायरी उतरला व तो झाला माणूस, माणूस स्वतःला विसरला आणि तो झाला 'पशु'.

३०

पोटाला धोंडा बांधून जर एखादा माणूस सागरात उतरला तर तो सरळ तळाला जाईल, त्याचप्रमाणे अज्ञान व अंधश्रद्धेचा धोंडा पोटाशी बांधून

जर माणूस संसार सागरात उतरला तर तो सरळ रसातळाला जाईल.

३१

आपल्या दुःखाला कारण देव किंवा दैव नसून आपणच असतो, अन्य कोणीही नाही, अशी ज्याची धारणा असते तो उन्नतीच्या मार्गाला लागतो, याच्या उलट आपल्या दुःखाला कारण कोणीतरी आपल्यावर करणी केली, मूठ मारली किंवा देव कोपला, वगैरे कल्पनेच्या आहारी गेलेल्या माणसाची अधोगती झाली नाही तरच नवल.

३२

जीवनात सुख-दुःखाचे प्रसंग सर्वांवर येतात मग तो पंत, संत वा भगवंत असो; म्हणून अशा प्रसंगी देव-देवस्की,



अंगारे-धुपारे यासाठी बुवाबाबाकडे धावण्याऐवजी नामस्मरण करीत स्थिर चित्ताने त्या प्रसंगांना धैर्याने तोंड देणे, हा शहाणपणाचा मार्ग होय.

३३

''व्यसनाधीन माणसे स्वतःच्या हाताने स्वतःच्या संसाराला आग लावून आपल्या बायका-पोरांना दुःखाच्या खाईत लोटतात हे प्रत्यक्ष पाहून सुद्धां इतर लोक त्याच मार्गाचा अवलंब करतात,'' हे जगातील सर्वात मोठे आश्चर्य होय.

३४

शंकराने विष पचविले म्हणून त्याला महादेव म्हणतात, त्याचप्रमाणे

अपयशाचे विष पचवून जो यशाच्या शिखराकडे झेप घेतो त्याला महापुरुष असे म्हणतात.

३५

बुवा, बाबा, भगत, फकीर, देवऋषी यांच्याजवळ चमत्कार करण्याचे अलौकिक सामर्थ्य असून ते संसारातील सर्व अडीअडचणी त्वरित दूर करू शकतात, व सर्व रोग बरे करु शकतात, अशी सामान्य लोकांची खुळचट समजूत असते. अशी ही खुळी व भोळी माणसे थातुर-मातुर हातचलाखीचे प्रयोग करणाऱ्या बाबा-भगताकडे जातात व पूर्णपणे फसतात, म्हणून चमत्कार तेथे कोपरांपासून नमस्कार.



३६

वस्तुस्थितीचा स्वीकार करून तिला सुरेख आकार देण्याच्या प्रयत्नांत यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली आहे.

३७

दुसऱ्यांना सुखी करण्याचा प्रयत्न कराल तर सुख तुमच्या घरी पाणी भरेल, याच्या उलट स्वतः सुखी होण्याच्या प्रयत्नात इतरांना दुःख द्याल, तर ते दुःख तुमच्या वाट्याला येवून तुमच्या डोळ्यातून पाणी काढेल.

३८

तुम्ही कुठल्याही धर्माचे, जातीचे, पंथाचे किंवा वंशाचे असा, परंतु सर्वप्रथम ''तुम्ही 'माणूस' आहात व

निसर्ग नियमांनुसार तुम्ही माणसासारखे वागलेच पाहिजे'', हे लक्षात ठेवा. हा निसर्गनियम जे लाथाडतात त्यांच्यावर निसर्गाकडून लाथा खाण्याचे प्रसंग येतात.

३९

साप माणसाला एकदाच दंश करुन त्याचा जीव घेतो, परंतु भ्रष्ट व अनिष्ट मार्गानी मिळविलेला शापित पैसा, ''हा साप'' माणसाला क्षणोक्षणी दंश करीत त्याचे जीवनच विषमय करून उध्वस्त करतो.

४०

मानवी शरीर हा एक विलक्षण कॉम्प्युटर असून तुम्ही त्याला 'विचार-



उच्चार-आचार' यांच्या द्वारा जे शुभ किंवा अशुभ फिडींग कराल त्या प्रमाणे तुम्हांला सुख-दुःखाचे रिझल्टस् मिळतील.

४१

देवाचा अवतार होईल व तो आपली सर्व दुःखातून सुटका करील अशा आशेने जर तुम्ही अवतार होण्याची वाट पहाल, तर तुमच्या वाट्याला दुर्दैवाचे दशावतार येवून तुमची पुरती वाट लागेल.

४२

माणसाने एकदा का आपले भवितव्य नशिबाच्या खुंटीला टांगले की नियती त्याला टांग मारल्याशिवाय रहात नाही.

**४३**

''सत्तेचा वापर लोकांच्या कल्याणासाठीच करायचा असतो; गडगंज संपत्ती संपादन करण्यासाठी नाही,'' या सत्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या सत्ताधिशाना भविष्यात लत्ताधीश व्हावे लागेल हे निश्चित.

**४४**

जीवनाला आवश्यक गोष्टींसाठी पैसा हवा हे खरेच, पण पैशाशिवाय माणूस सुखी होवू शकतो, हे ही लक्षात ठेवणे बरे.

**४५**

अनिष्ट व भ्रष्ट मार्गानी घरात येणारा पैसा हा एकटाच येत नाही तर तो



टेन्शन, शारिरीक-मानसिक रोग, मनस्ताप, दुःख, समस्या व संकटे या सर्व लवाजम्यासहित येत असतो.

**४६**

वास्तविक माणूस हा स्वतःच स्वसुखाचा गड्डा आहे, पण या सत्याचा विसर पडल्यामुळे त्याने स्वतःच स्वतःसाठी दुःखाचा खड्डा निर्माण केला आहे.

**४७**

सूर्यरूप विठ्ठल परमेश्वर, गुरुत्वाकर्षणाच्या विटेवर एकपणे अनेक युगे उभा राहून, विश्वांत प्रकाशाची उधळण करीत, चैतन्याची शोभा शोभवित असतो.

४८

वास्तविक माणूस जन्माला येतो केवळ आनंद लुटत आनंद इतरांना वाटण्यासाठी, परंतु ''जीवन जगणे ही कला आहे'' या सत्याचे आकलन न झाल्यामुळे तो दुःख संपादित करीत इतरांना दुःखाचे वाटप करीत रहातो.

४९

धर्म, वर्ण, जात, पंथ, वंश या भिंती धूर्त लोकांनी स्वतःच्या स्वार्थ साधण्यासाठी निर्माण केल्या व मूर्ख लोक मात्र त्यांच्या आहारी जावून या भिंतीवर डोकी आपटून रक्त बंबाळ होत स्वतःचा विनाश करून घेत आहेत.



५०

'जीवन जगणे ही कला आहे', या सत्याचे ज्ञान ज्यांना झाले त्यांनाच सध्याचे युग हे कलियुग नसून कलायुग आहे, हे उमजेल.

५१

जीवनाचा अर्थ जर अचूक उमजला नाही तर ते एका बाजुने अर्थशुन्य होते व दुसऱ्या बाजुने ते अनर्थकारक ठरते.

५२

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाच्या पुढाऱ्यांनी 'दांभिक निधर्मीवाद व अनाकलनीय समाजवाद' अशी खुळे जनतेच्या माथी मारुन एका बाजूने लोकांना खुळे केले व दुसऱ्या बाजूने राष्ट्र खिळखिळे करून सोडले.

५३

''माणसांनी माणसांबरोबर माणसांसारखे वागून परस्परांना सुखी करण्याचा प्रयत्न करणे'' हेच आहे देवाचे भजन-पूजन, तीच आहे देवाची भक्ति-उपासना आणि तोच आहे खरा धर्म.

५४

जनतेचे अकल्याण किंवा कल्याण करण्याचे सामर्थ्य राजसत्तेत असते, म्हणूनच जनतेच्या सुस्थितीची किंवा दुर्दशेची सर्व जबाबदारी राज्यकर्त्यांवरच पडते.



५५

आदर्शवादाच्या मृगजळामागे धावण्यात या देशाच्या पुढाऱ्यांनी ज्या महान चुका करून ठेवल्या आहेत त्या दुरूस्त करणे आतां केवळ ब्रह्मदेवालाच शक्य आहे.

५६

अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण व आरोग्य या पांच गोष्टी माणसाचे मूलभूत हक्क असून, हे हक्क म्हणून राष्ट्राच्या घटनेत समाविष्ट केले पाहिजेत, असा जीवनविद्येचा दृष्टिकोन आहे.

५७

''प्रारब्धवाद आणि पलायनवाद'' या राहू-केतूचे भारतीय समाजाला लागलेले ग्रहण सुटण्यासाठी प्रयत्नवाद व वास्तववाद यांची कास धरणे आवश्यक आहे.

५८

अहंकार हा आहे कलिकाळाचा फास, म्हणून अहंकाराचा नाश तेथे सर्व सुखाचा वास.

५९

''पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा'' हे खरे नाही. जीवनातील ९० टक्के घटना या स्वाधीन असून फक्त १० टक्के घटना पराधीन असतात.

६०

सत्कर्म करण्याने वैभव मिळणार नाही, परंतु शांती-सुख मिळेल, तर दुष्कर्म करण्याने वैभव मिळेल पण शांती-सुख मिळणार नाही, हे निश्चित.



६१

संचित, प्रारब्ध व क्रियमाण ही आपल्याच कर्मांची तीन तोंडे आहेत आणि म्हणूनच जीवनात आपल्याला जे सुख किंवा दुःख मिळते त्याला जबाबदार देव किंवा दैव नसून सर्वस्वी आपणच असतो.

६२

''परमेश्वर एक आहे, मानवजात एक आहे, मानवी मन एक आहे, मानव धर्म एक आहे, मानवी संस्कृती एक आहे'', ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन विश्वमानवाच्या विश्वशांतीचे एकच ध्येय डोळ्यासमोर ठेवून सर्वांनी प्रयत्न करण्यात मानवजातीचे कल्याण आहे.

६३

'कर्माचे फळ कर्मांतच असते', हा निसर्ग नियम होय, म्हणून तुम्ही इतरांचे भले कराल तर तुमचे भले होईल व जर तुम्ही दुसऱ्यांचे वाटोळे कराल तर तुमचे वाटोळे होईल हे निश्चित.

६४

सत्य, अहिंसा आदी तत्वे वैयक्तिक उन्नतीच्या दृष्टीने योग्य असली तरी राष्ट्रहिताच्या दृष्टीने सत्यासाठी असत्याचा व अहिंसेसाठी हिंसेचा स्वीकार करणे आवश्यक असते.



६५

पोटाला भूक असताना खाल्लेले अन्न हे पूर्ण ब्रह्म आहे, तर केवळ पानात टाकायचे नाही म्हणून पोटात ढकललेले अन्न म्हणजे ब्रह्मराक्षस होय.

६६

''ब्रह्मसत्यं जगन् मिथ्या'' अशी बडबड व वटवट करणाऱ्या पंडितांना दुपारी बारा वाजता पोटात कावळे काव काव करू लागले की, ''भूक सत्य व बाकी सर्व मिथ्या'', असा 'ब्रह्म साक्षात्कार' होतो.

६७

ज्या प्रमाणे साप आपली जुनी कात टाकून नवीन कात धारण करतो,

त्याप्रमाणे हे जग जुने रूप टाकून नित्य नवीन रूप धारण करीत असते. म्हणून जग हे मिथ्या नसून नित्य नूतन आहे.

६८

'वाढे वाढे अक्कल वाढे' असे घडले असते तर या जगाचे नंदनवन झाले असते, परंतु प्रत्यक्षात मात्र 'वाढे वाढे अक्कल पुढे' असे घडते, ही मोठी खेदाची गोष्ट आहे.

६९

अभ्यासाचा कंटाळा म्हणजे भाग्याला टाळा. वास्तविक अभ्यासाला सर्व कांही शक्य आहे, एवढे प्रचंड सामर्थ्य अभ्यासात आहे. म्हणून अभ्यासाला पर्याय नाही, हे प्रत्येक माणसाने सदैव लक्षात ठेवले पाहिजे.



७०

गणित सोडविताना 'हातचा एक धरायला विसरलो तर सबंध गणित चुकते, त्याच प्रमाणे जीवनाचे गणित सोडविताना हृदयातल्या एका प्रभुला जर आपण विसरलो तर जीवनाचे सर्व गणित चुकते.

७१

एरव्ही शुन्याची किंमत पुज्यच, परंतु याच शुन्याच्या पाठी एक ठेवला की त्याची किंमत दसपटीने वाढते, त्याचप्रमाणे या अफाट विश्वाच्या पसाऱ्यात माणसाची किंमत शुन्यच आहे, परंतु एक प्रभू, सद्‌गुरू रुपाने त्याच्यापाठी उभा राहिला तर शून्य किंमतीचा माणूस पूज्य होतो.

७२

अनिष्ट मार्गाने संपादित केलेली गडगंज संपत्ती मुलांच्या बुद्धिला गंज चढवते, गांजा-अफू, दारु-गर्द अशा अनिष्ट व्यसनांच्या आहारी नेते, आणि सरते शेवटी त्यांना रसातळाला नेऊन पोहोचविते.

७३

संसार सुखाचा करण्यासाठी पैशाची कमाई जितकी आवश्यक आहे, तितकीच किंबहुना कांकणभर अधिकच पुण्याईच्या कमाईची गरज असते.



७४

''हाताने काम, मुखाने नाम, व अंतःकरणात राम'', हाच जीवनात आराम मिळविण्याचा राजमार्ग होय.

७५

''देवाने माणसांना डोकी देऊन सुद्धां ती डोकी शहाणपणाने वापरायचीच नाही असा जणू त्यांनी निश्चय केल्यामुळे एकमेकांची डोकी फोडण्याचे प्रसंग निर्माण होतात'', हीच मानवी जीवनातील मोठी डोकेदुखी होय.

७६

'माणसांतील माणुसकी जागृत करणे', हाच आहे खरा धर्म, तेच आहे खरे शिक्षण व तोच आहे मानव जातीच्या सर्व समस्यांवरील प्रभावी उपाय.

**७७**

देवाच्या दर्शनातून खऱ्या परमार्थाची सुरूवात होते तर स्वये देव होण्यात त्याची सांगता होते.

**७८**

वास्तविक संसाराच्या कळीतून परमार्थाचे कमळ उमलले पाहिजे, परंतु सामान्य माणसे ज्या पद्धतीने परमार्थ करतात त्याने संसाराची कळीच कुस्करली जाते.

**७९**

शुद्ध परमार्थ 'केवळ पहाण्यात' आहे, हे वर्म उमजले नाही तर सर्व परमार्थ पाण्यांत समजावा.



**८०**

खरा परमार्थ खऱ्या सद्‌गुरुंची भेट झाल्यावरच सुरु होतो व सदगुरुंची कृपा झाल्यावर तो पूर्ण होतो.

**८१**

सुख हे मानण्यात आहे, या कल्पनेतच मानवजातीच्या सर्व दुःखाचे मूळ आहे.

**८२**

''इतरांच्या सुखात आपले सुख लपलेले आहे, तर दुसऱ्यांच्या दुःखात आपले दुःख दडलेले आहे'', या सत्याची खऱ्या अर्थाने खरी जाणीव झाल्याशिवाय मानवी जीवनात खरी क्रांती होणे शक्य नाही.

**८३**

देहाच्या कपाटात स्मरण आणि विस्मरण हे दोन खण असतात. संसारातील कुठल्या गोष्टी कुठल्या खणात टाकायच्या यावर संसारातील सुख-दुःख अवलंबून असते.

**८४**

बहिर्मन व अंतर्मन या दोघांत जेव्हां संवाद असतो तेव्हां जीवनात सुखाचा सुकाळ होतो, परंतु जेव्हां या दोघांत वितंडवाद होतो तेव्हां जीवनात सुखाचा दुष्काळ होतो.

**८५**

जे लोक सुख मिळविण्यासाठी कशाच्याही मागे पळत सुटत नाहीत,



त्यांच्यामागे ''माझा स्वीकार करा हो'', असे म्हणत सुख धावत असते.

**८६**

विचार हा चैतन्यशक्तीचा आविष्कार असून तो जीवनाला आकार देणारा कुशल कुंभार आहे.

**८७**

अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण व वैद्यकीय मदत या सुविधा न मिळण्यात माणसाचे खरे दुःख भरलेले आहे; या व्यतिरिक्त बाकीची सर्व दुःखे मानव निर्मित असतात.

**८८**

दुसऱ्यांच्या दुःखाने सुखी होतो तो दानव, दुसऱ्यांच्या दुःखाने दुःखी होतो

तो मानव व दुसऱ्यांच्या सुखाने सुखी होतो तो देव जाणावा.

८९

एकमेकांना एकमेकांनी पाडण्याच्या प्रयत्नांत सर्वच कोसळतात तर त्याच्या उलट एकमेकांना एकमेकांनी आधार दिल्याने सर्वच यशस्वी होतात.

९०

लेकरू जसे स्तनाला तोंड लावून आईला पिते, त्याप्रमाणे देवाला बिलगून उर्ध्वमुखे प्रभुला पित राहणे म्हणजेच दिव्यसाधना.

९१

घरातील पत्नी संसारात अनेक प्रकारच्या जबाबदाऱ्या उचलीत



असते. घरातील सर्वांची पोटापाण्याची व्यवस्था करते म्हणून ती अन्नमंत्री, सर्वांच्या आरोग्याची काळजी घेते म्हणून ती आरोग्यमंत्री, मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देते म्हणून ती शिक्षणमंत्री, घरातील सर्व व्यवस्था पाहते म्हणून ती गृहमंत्री व योग्य वेळी योग्य सल्ला देते म्हणून ती सल्लागार आहे. स्त्रीची ही कर्तव्य तत्परता लक्षात घेता तिला घरात व समाजात मानाचे स्थान असले पाहिजे.

९२

संतुष्ट पत्नी ही ऐश्वर्य लक्ष्मीला आमंत्रण देणारी गृहलक्ष्मी होय.

**९३**

ज्या घरात स्त्रियांचा छळ होतो, तेथे दैन्य आणि दुःख कायम वास करतात.

**९४**

पहाणाऱ्याला विशिष्ट सद्‌गुरूप्रणित अभ्यासाने अनुभवता अनुभवता आत्मानुभवाचे अनुभवामृत प्राप्त करून घेणे म्हणजेच दिव्यसाधना.

**९५**

सद्‌गुरूंकडून दिव्यसाधना मिळणे हे भाग्य, ती समजणे हे महाभाग्य, ती सतत करण्याची बुद्धी होणे हे परमभाग्य व ती साध्य होणे हे साधकाचे सौभाग्य होय.



**९६**

दिव्यबोध व दिव्यसाधना हे सद्‌गुरूंचे दोन चरण ह्दयांत घट्ट धरून ठेवल्याने साधक एका अंगाने सद्‌गुरूपदावर आरूढ होतो तर दुसऱ्या अंगाने तो स्वरुपाकार होऊन राहतो.

**९७**

''तुझे आहे तुजपाशी परि तू जागा चुकलासी'', या संत उक्तीप्रमाणे श्री सद्‌गुरू साधकाला प्रथम जागा करुन मग त्याला त्याच्याच पाशी असलेल्या देवाची जागा दाखवितात.

**९८**

बहुमोल पण बिनमोल अशी दिव्यसाधना सद्‌गुरूकडून प्रसाद

म्हणून साधकाला प्राप्त होऊन सुद्धां ज्यांना त्याचे यथार्थ मोल उमजत नाही, ते करंटे होत.

९९

ज्ञान हे शस्त्र, अस्त्र व शास्त्र आहे. ज्ञान हे शक्ती, बल व सामर्थ्य आहे. ज्ञान हे धन, संपत्ती व ऐश्वर्य आहे. ज्ञान हा देव, ईश्वर व परमेश्वर आहे म्हणून ज्ञानी व्हा व धन्य व्हा.

१००

नामस्मरणाचे प्रकार तीन आहेत. देवाच्या नामाचे स्मरण हे नामस्मरण. देवाला 'पहात पहात' केलेले देवाचे स्मरण हे भावस्मरण व देव होऊन देवाचे केलेले स्मरण हे दिव्यस्मरण.



१०१

सहज असणारा देव सहज कसा प्राप्त करून घ्यावयाचा हे सहज शिकवितात ते सद्‌गुरू.

१०२

अक्कलशुन्य माणसे दुसऱ्यांची निंदा-नालस्ती करण्यात सदैव आघाडीवर असतात कारण 'निंदा करणे' ही एकच गोष्ट अशी आहे की त्यासाठी अक्कल लागत नाही.

१०३

मूर्ख माणसे, मेल्यानंतर स्वर्गाला जाण्याची वाट पहातात तर सूज्ञ माणसे या पृथ्वीवर स्वर्ग निर्माण करण्याचा प्रयत्न करतात.

१०४

अंतःकरणात स्वरुपाची जागृती होऊन आत्मानुभव प्राप्त होणे यालाच देवाचा साक्षात्कार असे म्हणतात. या व्यतिरिक्त सामान्य लोक ज्याला देवाचा साक्षात्कार असे म्हणतात तो कमी-अधिक भ्रमाचाच प्रकार असतो.

१०५

माणूस हा विचार करणारा प्राणी आहे असे म्हणण्यापेक्षा 'विचार करतो तो माणूस' असे म्हणणे अधिक संयुक्तिक ठरेल.

१०६

मानवजातीच्या सर्व समस्या सहज सुटून ती सुखशांतीच्या नंदनवनात नित्य वास करीत राहील, जर



मानवजातीने 'अखिल मानव-जातीचे हित' लक्षात घेऊन तीच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला तर अन्यथा इतिहासाची पुनरावृत्ती अनंत काळपर्यंत होतच राहील.

१०७

जप किती केला यापेक्षा जपांत किती लक्ष होते याला अधिक महत्व आहे, त्याचप्रमाणे जपांत किती लक्ष होते यापेक्षा जप करतांना अलक्षाकडे किती लक्ष होते याला सर्वात अधिक महत्व असते.

१०८

अनिष्ट व भ्रष्ट मार्गांनी मिळविलेला शापित पैसा, तो मिळविणाऱ्यांना तापदायक तर ठरतोच, पण तो पैसा

त्यांच्या मुलाबाळांना व पुढील पिढ्यांना, वारसा हक्काने व निसर्गनियमानुसार अत्यंत क्लेशकारक, दुःखकारक व हानीकारक ठरतो.

१०९

नको एकशाही, नको लोकशाही, नको ठोकशाही, पाहिजे ती हुशार व प्रामाणिक अशा कार्यक्षम लोकांच्या हातांत सत्ता सुपूर्द करणारी शहाणपणशाही. स्वराज्याचे सुराज्यात परिवर्तन घडवून आणण्याचा हाच एक प्रभावी उपाय आहे.



११०

माणसाच्या जीवनावर विचारांचा जबरदस्त पगडा असतो आणि तोच त्याच्या डोक्यावर सुख-दुःखाची पगडी ठेवण्यास कारणीभूत ठरत असतो.

१११

ज्याप्रमाणे हवा प्रत्यक्ष अस्तित्वात असून सुद्धां ती डोळ्याला दिसत नाही किंवा इतर इंद्रियांना तिला अनुभवता येत नाही, त्याप्रमाणे परमेश्वराचे अस्तित्व प्रत्यक्ष असून सुद्धां तो डोळ्याला दिसत नाही किंवा त्याला इतर इंद्रियांना अनुभवता येत नाही. परंतु नाक धरले की हवेचा साक्षात्कार होतो, त्याप्रमाणे मन धरले की देवाचा साक्षात्कार होतो.

## जीवन विद्येचे स्फूर्तीगीत

हे जग सुखी व्हावे. हे जग सुखी व्हावे
हे राष्ट्र आमुचे सर्वार्थाने पुढे पुढे जावे ।। धृ.।।

तुम्ही ज्ञानी व्हा, तुम्ही हुशार व्हा, बुद्धीवान व्हा सारे
पै नाथांच्या संदेशाला, मनात रुजवावे ।। १ ।।

उत्कर्षासह उन्नतीने, खरी प्रगती साधे
नकळत क्रांती जीवनविद्येची, जगतारक आहे ।। २ ।।

आम्ही सारे हिंदुस्थानी झालो, राष्ट्रासाठी एक
राष्ट्रप्रगती हेचि ध्येय, आहे आमुचे एक ।। ३ ।।

सद्‌गुरू श्री. वामनराव पै

## विश्व प्रार्थना

''हे ईश्वरा,
सर्वांना चांगली बुद्धी दे,
आरोग्य दे,
सर्वांना सुखात, आनंदात,
ऐश्वर्यात ठेव,
सर्वांचं भलं कर, कल्याण कर,
रक्षण कर,
आणि तुझे गोड नाम मुखात अखंड
राहू दे''

**सद्‌गुरू श्री. वामनराव पै**

**''जीवन विद्येचे शिल्पकार''**

सद्‌गुरू श्री. वामनराव पै

यांचा

**दिव्य संदेश**

''तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार''

**दिव्य शिकवण**

या जगात 'शहाणपण' हे खरे अमृत होय. आपण दुसऱ्यांना जे सुख किंवा दुःख देतो ते सुख-दुःख आपणाकडे बुमरँग होऊन न चुकता परत येते, हा निसर्गाचा अटळ नियम नीट लक्षात घेऊन जीवन जगण्यात खरे 'शहाणपण' होय.

**दिव्य संकल्प**

शुभ चिंतावे, शुभ इच्छावे, वचनी शुभ बोलावे

शुभ कर्मांच्या सामर्थ्याने करावे जीवनाचे सोने.

**जीवन विद्या मिशन**
**नाम संप्रदाय मंडळाची प्रकाशने**

**लेखक : सद्‌गुरू श्री. वामनराव पै**

**नामाचा नंदादीप**
**ज्ञानेशांचा संदेश**
**अमृत मंथन**
**तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार**
**जीवन विद्येचा मंगल कलश**
**अंधार अंधश्रद्धेचा**
**जीवन विद्या दर्शन**
**सुगंध जीवन विद्येचा**
**सुखी जीवनाचे पंचशील (मराठी, हिंदी, गुजराथी)**
**तुमचे भाग्य तुमच्या विचारात (मराठी, हिंदी)**
**सुखाचा शोध आणि बोध**
**हीच खरी मुर्तिपुजा व हाच खरा धर्म**
**सार्थ हरिपाठ**
**जीवन विद्या स्मरणी (मराठी, हिंदी गुजराथी)**
**Master Key To Happy Life**
**Your Destiny In Your Thoughts**
**Gift of Wisdom**